(रजि. नं. ई २१ दि. १३/०७/१९५३)

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी

## जिल्हा शाखा जळगाव

''रेडक्रॉस भवन'', सिव्हिल हॉस्पिटल शेजारी, जळगाव. फोन नं. ०२५७-२२२६२३३, २२३५८५५, २२३६२५५

Email - ircs_ jal@yahoo.in, ircs1953@gmail.com • Web.: www.redcrossjalgaon.org FB.: Ircsjalgaon

Please Download Red Cross Jalgaon App

## वार्षिक सर्वसाधारण सभा क्रं ६५ व्या सभेची सूचना

प्रति, सोमवार दिनांक १६-०९-२०२४

**सन्माननिय सभासद, सप्रेम नमस्कार....!**

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा. जळगाव, सन २०२३-२०२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक - ०६/१०/२०२४ रोजी सकाळी ठीक - ११.०० वाजता संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा.श्री.आयुष प्रसाद (भा.प्र.से.) यांचे अध्यक्षतेखाली रेडक्रॉस भवन, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जिल्हा शाखा जळगाव येथे आयोजित केली आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

## -: सभेचे विषय :-

१) दिवंगतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करणे. २) मंगळवार दिनांक - २१/११/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. ३) आर्थिक वर्ष २०२३ - २०२४ चा रेडक्रॉस, रक्तकेंद्र, आणि विविध उपक्रमांचा वार्षिक कामकाजाचा कार्य अहवाल सादर करणे. ४) आर्थिक वर्ष २०२३-२०२४ चे अंकेक्षित नफा तोटा पत्रके व ताळेबंद सादर करून मंजूरी घेणे. ५) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ करीता उत्पन्न खर्चाचे अंदाज पत्रक सादर करून मंजूरी घेणे. ६) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ करीता ऑडिटरची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणे. ७) इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, जळगावची सन २०२४ ते सन २०२७ पर्यंतच्या कालावधीसाठी रेडक्रॉस नुतन कार्यकारिणीची निवड जाहिर करणे. ८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

**टीप -**

१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास, तहकूब सभेचे कामकाज नियमाप्रमाणे अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सुरू होईल, अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही. २) आर्थिक वर्षातील हिशेबाच्या व्यवहारासंबंधीची माहिती दिनांक -०२/१०/२०२४ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ५ या कार्यालयीन वेळेत सभासदांनी लेखी मागणी केल्यास कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. ३) सभेसंबंधी आपल्या काही सूचना किंवा आयत्या वेळेच्या विषयांसाठी विषय असल्यास कृपया लेखी स्वरुपात दि. ०४/१०/२०२४ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ५ या वेळेत रेडक्रॉस कार्यालयात आणून द्यावेत. ४) कृपया सभेस येतांना अहवाल सोबत आणावा ही विनंती. ५) फक्त सभासदांनाच सभेस उपस्थित राहता येईल.

सही/-

विनोद बियाणी

चेअरमन, रेडक्रॉस



सन्माननीय सभासद, सस्नेह नमस्कार,

सर्वप्रथम रेडक्रॉसच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांचे मन:पूर्वक स्वागत...! रेडक्रॉस जळगाव शाखेमार्फत सुरु असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा अहवाल तसेच वर्षभराचा आर्थिक व्यवहाराचा लेखा जोखा,जमाखर्च, ताळेबंद व लेखा परीक्षण अहवाल आपल्या समोर सादर करतांना मला मनापासून आनंद होत आहे. मागील वर्षभरात रेडक्रॉस मार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. रेडक्रॉसचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य आपापल्या परीने सर्वतोपरी सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. जळगाव जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्य क्षेत्रातील गरजा लक्षात घेता आवश्यकतेनुसार माझ्या मार्गदर्शनाने नवीन उपक्रम राबविण्यासाठी रेडक्रॉस प्रयत्नशील आहेच. हे सर्व करीत असतांना सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व सभासद, दानशूर देणगीदाते, जिल्हा प्रशासन, उत्स्फूर्त रक्तदाते, रक्तदान शिबीर आयोजक, समाजसेवक, स्वयंसेवक, कर्मचारी, हितचिंतक यांचे बहुमोल सहकार्य मिळत आहेच, याबद्दल कार्यकारिणीच्या वतीने सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो.

रेडक्रॉसच्या सेवाकार्याचा जिल्ह्याभरात विस्तार होऊन जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातील नागरिकांना आरोग्य सेवा मिळाव्या यासाठी नवीन आरोग्य उपक्रम हाती घेतले जात आहेत. महिलांचे आरोग्य चांगले व्हावे यासाठी विनामूल्य आरोग्य तपासणी व मार्गदर्शन तसेच जिल्ह्याभरात शालेय विद्यार्थी ते वयोवृद्धासाठी स्व.श्री. रतनलालजी बाफना फाउंडेशन ट्रस्ट यांच्या सहकार्याने स्व.मांगीलालजी बाफना रेडक्रॉस नेत्रालय व फिरते नेत्रालय उपक्रम सुरु करीत आहोत. तसेच नेत्रदान, देहदान आणि अवयवदान चळवळ अधिक बळकट व्हावी यासाठी जनजागृतीपर उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. रेडक्रॉस रक्तकेंद्रात जगातील सर्वाधिक सुरक्षित NAT तंत्रज्ञानाचा प्रचार-प्रसार व्हावा यासाठी सर्व प्रयत्नशील आहेत.

नागरिकांच्या सामाजिक गरजा लक्षात घेऊन अपेक्षित उपक्रम राबवित समाजाला सर्वोत्कृष्ठ सेवा देणारी, महाराष्ट्रातील सर्व रेडक्रॉस शाखांमध्ये सर्वोत्कृष्ठ शाखा म्हणून रेडक्रॉस राज्य शाखेतर्फे देण्यात येणारा राजा महाराजा सिंह सेवा राज्य पुरस्कार २०२१-२२ तसेच जास्तीत जास्त सेवाभावी लोकांना संस्थेचे आजीवन सभासद करून रेडक्रॉसच्या सेवाकार्यात सामावून घेतल्यासाठीचा रेडक्रॉस मेरीट राज्य पुरस्कार २०२२-२३ हे दोन्ही पुरस्कार रेडक्रॉस जळगाव शाखेला महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष व जळगाव रेडक्रॉसचे मार्गदर्शक मा. श्री. किशोर राजे निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

रेडक्रॉसच्या तिन्ही धर्मार्थ दवाखान्याच्या माध्यमातून जळगाव शहरातील अनेक गरजू रुग्णांना अत्यल्प सेवाशुल्कात रुग्णसेवा देत आहोतच, सोबत रेडक्रॉसच्या पुढाकाराने सुरु असलेल्या सर्व जेनेरिक मेडिकल्समार्फत सवलतीच्या दरात औषधी ही उपलब्ध केल्या आहेत. तज्ञ वैद्यकीय पथकासह सुसज्ज असलेल्या रेडक्रॉस मोबाईल हेल्थ व्हॅनच्या माध्यमातून आवश्यकतेनुसार जिल्ह्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागात विविध आरोग्य शिबिरेही राबविली जात आहेत.

रेडक्रॉस ऑक्सिजन बँक आणि रेडक्रॉस ऑर्थोपेडीक बँक मार्फत रुग्णांना गरजेपुरते देत असलेल्या ऑक्सिजन मशीन्स आणि ऑर्थोपेडीक साहित्यामुळे गरजू रुग्णांना विनामुल्य सेवा मिळत आहेच, त्यामुळे त्यांचा आर्थिक बोझा ही कमी होत आहे. या दोन्ही सुविधांचा संपूर्ण जिल्ह्यातील रुग्णांना फायदा होत आहे. शिवाय रेडक्रॉस फिजियोथेरपी सेंटरमुळे रुग्णांना अत्यल्प सेवाशुल्कात सेवा देत आहोत, तर दिव्यांगांना विनामुल्य सेवा देणे शक्य होत आहे. या सर्व आरोग्य सेवासुविधांमुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत. रेडक्रॉस दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या विविध सेवांमुळे दिव्यांगांना मदत मिळत आहे. दिव्यांगांसाठीच्या शासनाच्या विविध योजनांतून वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली शिबिरांमधून दिव्यांगांना सुविधा उपलब्ध करून देत आहोत. कार्यकारिणी मंडळातील सर्व सहकारी माझ्यासोबत वेळोवेळी चर्चा करून सेवाभावी दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून योग्य व्यवस्थापन करीत रेडक्रॉसचे सर्व उपक्रम सुरळीत सुरु राहण्यासाठी प्रयत्नशील असतात. यामुळे जनहिताचे निर्णय घेऊन निरंतर सेवाकार्य करणे सहज शक्य होत आहे.

आपण लवकरच रौप्य महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत आहोत. या यशस्वी वाटचालीत संस्थेशी आपले नाते हे विश्वासात्मकता दृढ होईल आणि सर्वांच्या अपेक्षांना आपण सार्थ ठरवू अशी मी कार्यकारिणीच्या वतीने हमी देतो. संस्थेच्या व्यापक सेवाकार्यासाठी शाश्वत कार्यक्षम व्यवस्था निर्माण करण्यासाठी रेडक्रॉसचे कार्यकारिणी मंडळ सदैव कटीबद्ध आहे. काही सुचना असल्यास अवश्य कळवाव्यात त्या सूचनांचे स्वागतच आहे. संस्थेच्या नवनवीन उपक्रमांची व्याप्ती विस्तारित करून तळागाळातील लोकांपर्यंत रेडक्रॉसचे आरोग्य सेवेतील कार्य पोहोचविण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची आणि सक्रीय सहभागाची आवश्यकता आहे. आपण सर्वांनी आपापल्या परीने वेळ देऊन उपक्रमांना योगदान द्यावे अशी मनपूर्वक अपेक्षा व्यक्त करतो.

आर्थिक वर्ष सन २०२३ - २०२४ चे जमा खर्चाचे लेखा परीक्षण संस्थेचे सी.ए. श्री. परीक्षित भदादे यांनी वेळेत पूर्ण करून दिले. संस्थेच्या विविध उपक्रमांना व दैनंदिन कामकाजास दानशूर देणगीदाते, संस्थेचे सम्माननीय सभासद, प्रचार-प्रसार माध्यमे, रक्तकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी,प्रशासनातील कर्मचारी, जनसंपर्क अधिकारी, रेडक्रॉस रक्तकेंद्रातील कर्मचारी, स्वयंसेवक व इतर सर्व ज्ञात अज्ञात व्यक्ती, संस्था, हितचिंतक यांनी मोलाचे सहकार्य दिले, त्याबद्दल या सर्वांचे आभारी आहोत. आपले स्नेह आणि सहकार्य असेच सोबत असावेत हीच सदिच्छा...!

आयुष प्रसाद (भा.प्र.से.)

अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी

## विनम्र आवाहन

आपण सर्व रेडक्रॉस या आंतराष्ट्रीय संस्थेचे सभासद आहात. आपण आपल्या वाढदिवसानिमित्त, लग्नाच्या वाढदिवसानिमित्त, आप्तेष्टांच्या विशेष दिनानिमित्त किंवा एखादया विशेष कार्यक्रम प्रसंगी आपल्या राहत्या भागात, वार्डात किंवा जवळपासच्या परिसरात, आपल्या कार्यक्षेत्रात, सामाजिक, राजकिय, सांकृतिक व धार्मिक कार्यक्रम प्रसंगी रक्तदान शिबाराचे आयोजन करा, आणि या जीवनदायी कार्यात सक्रीय सहभाग घ्या. आपला सक्रीय सहभाग अनेक रूग्णांना जीवनदान देईल.

**चला... आपलंच कुणीतरी आपली वाट पाहतंय... रक्तदान करूया आणि प्रेमाची नाती जोडुया...!**

सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव



## रेडक्रॉस जळगाव शाखेला महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ठ रेडक्रॉस शाखा पुरस्कार प्रदान

रेडक्रॉस राज्य शाखा मुंबईच्या वतीने रेडक्रॉस जळगाव शाखेला सन २०२१- २२ च्या कार्यकाळात वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध सेवाभावी उपक्रमांसाठी देण्यात येणारा राजा महाराजा सिंह सर्वोत्कृष्ठ रेडक्रॉस शाखा पुरस्कार तसेच सन २०२२- २३ च्या कार्यकाळात रेडक्रॉसच्या सेवाकार्यात सर्वात जास्त नवीन सभासदांना सहभागी करण्यासाठीचा रेडक्रॉस राज्य शाखेचा मेरिट पुरस्कार देऊन जळगाव रेडक्रॉस शाखेला गौरविण्यात आले.



● **रक्तकेंद्र २४ तास सेवा :-** इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव संस्थेचा रक्तकेंद्र हा प्रमुख उपक्रम असून गेल्या ४३ वर्षांपासून जळगाव जिल्हा व आसपासच्या जिल्ह्यातील रुग्णांना अखंडित रुग्णसेवा करण्याचे कार्य अविरतपणे सुरु आहे. अद्ययावत तंत्रज्ञान, सुसज्ज वास्तू, प्रशिक्षित स्टाफ असल्याने जळगाव जिल्हा व आसपासच्या जिल्ह्यातील नागरिकांना सुरळीत सेवा देणे शक्य होत आहे. याशिवाय जळगाव रेडक्रॉस रक्तकेंद्र हे जागतिक दर्जाचे सर्वाधिक सुरक्षित नॅट (NAT) प्रणालीयुक्त उत्तर महाराष्ट्रातील एकमेव रक्तकेंद्र असल्याने रुग्णांच्या विश्वासाला पात्र ठरत आहे.

रेडक्रॉस रक्तकेंद्रामार्फत या आर्थिक वर्षात एकूण १४०३५ रक्तघटकांचा पुरवठा रुग्णांना करण्यात आली असून त्यात डेंग्यू, विषारी मलेरिया बाधित रुग्णांना ३५९ एस.डी.पी आणि १३६२ आर.डी.पी. प्लेटलेट्स घटकांचा पुरवठा करून जीवनदान देण्यात आले आहे. या वर्षात २४४९ पी.सी.व्ही. (PCV) रक्तघटक थँलेसीमिया रुग्णांना विनामूल्य देण्यात आल्या आहेत. जिल्ह्या भरातील ७० ते ८०% थँलेसीमिया ग्रस्त रुग्णांना सुरळीत रक्तपुरवठा करून या रुग्णांना जीवनदान देण्यात योगदान देत आहोत, याचे आंतरिक समाधान आहे. तसेच या थँलेसीमिया रुग्णांना सर्वाधिक सुरक्षित नॅट (NAT) प्रमाणित रक्ताचा विनामुल्य पुरवठा व्हावा म्हणून संस्थेकडून थॅलेसीमिया अमृत योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेत थॅलेसीमिया ग्रस्त बालकाला एका वर्षासाठी आपण रु.११०००/- वार्षिक देणगी देऊन त्या रुग्ण बालकास विनामुल्य नॅट (NAT) प्रमाणित रक्त देऊ शकतो. जेणेकरून या रुग्णांचे जीवनमान उंचावेल. या योजनेस समाजातील दानशूर व्यक्तींचे योगदान मिळत असून आतापर्यंत ५८ थॅलेसीमिया ग्रस्त बालकांना दानशुरांनी दत्तक घेतले असून या मुलांना नॅट प्रमाणित रक्तपिशवी विनामूल्य देण्यात येत आहे. यात मेरिको लिमिटेड, रोटरी क्लब जळगाव वेस्ट आणि रोटरी क्लब जळगाव मिडटाऊन व इतर दानशुरांचे मोलाचे योगदान आहे. रक्तकेंद्रामार्फत नियमितपणे सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था,विविध मंडळे, शिबीर आयोजक यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीरे आयोजित केली जातात. याशिवाय सोशल मिडिया आणि एस.एम.एस.च्या माध्यमातून रक्तदानाच्या प्रचार व प्रसाराकरिता सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी, कर्मचारी व स्वयंसेवक सतत प्रयत्नशील असतात. रक्तसंकलनाकरिता दोन अद्ययावत वातानुकूलीत वाहने असल्याने त्या माध्यमातून रक्तकेंद्र आपल्या दारी या उपक्रमांतर्गत रक्तसंकलन केले जाते. यामुळे संपूर्ण जिल्ह्याभरात रक्तसंकलन करणे सुलभ झाले आहे. रेडक्रॉस राज्य शाखा मुंबई यांच्या प्रयत्नातून आणि India Ratings Research - Fetch Group Company, Mumbai या कंपनीच्या सी.एस.आर. देणगीतून एरंडोल तालुक्यात डॉ. किरण पाटील यांच्या आई हॉस्पिटलमध्ये रेडक्रॉसमार्फत ब्लड स्टोरेज सेंटर सुरु करण्यात आले. या ठिकाणी रेडक्रॉस राज्य शाखा मुंबई रेडक्रॉसचे एक्झीक्युटीव सेक्रेटरी श्री. चार्ल्स पॉल व मुख्य लेखापाल श्री. प्रशांत भोसले यांनी भेट देऊन पाहणी केली. तसेच शिरपूर येथील इंदिरा स्टोरेज सेंटरला दुसरी मदर ब्लड सेंटर म्हणून रेडक्रॉस रक्तकेंद्र सेवा देणे प्रस्तावित आहे, जेणेकरून धुळे आणि शिरपूर मधील रुग्णांना रक्तसेवा देणे शक्य होईल. रक्तदात्यांच्या परिवाराचे आर्थिक संरक्षण म्हणून एक सामाजिक भावनेतून रेडक्रॉस रक्तकेंद्रामार्फत रक्तदाता अपघात विमा योजना सुरु असून त्यात किमान रु.५०,०००/- ते रु.२,००,०००/- रकमेचे अपघाती विमा सरंक्षण करण्यात येते, या योजनेअंतर्गत आतापर्यंत अपघातात मृत पावलेल्या २१ रक्तदात्यांच्या वारसांना एकूण १३,५०,०००/- विमा रक्कम देण्यात आलेली आहे. गरीब-गरजू रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठ्याकरीता जीवनदान योजना सुरु असून या योजेनेत रु. २१०००/- व त्यापटीत दानशूर दात्यांकडून देणगी रक्कम स्विकारली जाते, या योजने अंतर्गत दरवर्षी कायमस्वरूपी एक रक्तपिशवी गरीब गरजू रुग्णांना विनामूल्य देण्यात येते. तसेच भावस्पर्श योजनेत रु.२१००/- देणगी स्वीकारली जाते. त्यातून वर्षातून एकदाच एक रक्तपिशवी गरीब गरजू रुग्णास विनामूल्य देण्यात येते. अर्थात या देणगीस आयकरात ८० जी नियमानुसार सूट मिळते. गरीब व गरजू रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठा होण्याकरिता आपणही या योजनेत सहभाग घेऊन हातभार लावावा ही विनंती.



**कन्सल्टंट डॉक्टर्सनी शक्यतो उपचार घेत असलेल्या सर्वच रुग्णांना सर्वाधिक सुरक्षित नॅट टेस्टेड रक्त व रक्तघटक घेण्यासाठी आग्रह करावा. असे कळकळीचे आवाहन आहे.**

● **शालेय विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी शिबीरः-** शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक उपक्रम राबवले जातात यात आता प्रत्येक विद्यार्थ्यांचा रक्तगट हा विद्यालयात रेकॉर्डला असणे आवश्यक आहे रेडक्रॉस रक्तकेंद्रामार्फत महानगरपालिका अंतर्गत शाळांमधील विद्यार्थ्यांची विनामूल्य रक्तगट तपासणी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यात ६५०० विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली.

● **महिलांच्या हिमोग्लोबिन वाढीसाठी नियमित तपासणी व मार्गदर्शनः-** महिलांचे रक्तदान करण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे खूप इच्छा असूनही अनेक महिलांना रक्तदान करता येत नाही. महिलांनी रक्तदानाच्या क्षेत्रात पुढे यावे आणि स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी या उद्देश्याने महिलांची हिमोग्लोबिन तपासणी केली जाते. तसेच हिमोग्लोबिन वाढीसाठी तज्ञ डॉक्टरांकडून नियमित मार्गदर्शन केले जाते व गरजेनुसार पूरक औषधींचे वाटप करण्यात येते.

सेवा... स्नेह... समर्पण...

# ✚ इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव ✚



**●रोटरी महारक्तदान अभियान :-** रेडक्रॉस अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा.श्री.आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनानुसार उन्हाळ्यातील रक्ताच्या तुटवड्याच्या प्रसंगी रेडक्रॉस रक्तकेंद्र आणि रोटरी क्लब जळगाव वेस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ मे २०२४ ते ३० जून २०२४ दरम्यान रोटरी महारक्तदान अभियानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. रोटरीतील सर्व सदस्यांच्या सहकार्याने विविध कंपन्या, कॉलनी, कार्यक्षेत्रात तसेच शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी मोबाईल ब्लड डोनर व्हॅन पाठवून रक्तसंकलन करण्यात आले. संपूर्ण दोन महिन्यात एकूण १६५१ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

**● विक्रमी रक्तदाते श्री.अशोक काछवाणी यांचे १५१वे रक्तदान:-** जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून जळगाव शहरातील विक्रमी रक्तदाते मा. श्री. अशोक काछवाणी यांनी १५१ वे रक्तदान करून समाजाला रक्तदान करण्याची प्रेरणा दिली. या प्रसंगी जळगाव शहराचे आमदार मा.श्री. राजूमामा भोळे, सिंधी समाजातील सर्व पंचायत प्रतिनिधी व रेडक्रॉसचे पदाधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी इतर उपस्थित रक्तदात्यांनी रक्तदान करून श्री. अशोक काछवाणी यांना शुभेच्छा दिल्या. रेडक्रॉसच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

**● रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (RDDRC):-**केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग अंतर्गत दिव्यांगांच्या सर्वांगिण पुनर्वसनासाठी कार्यान्वयीत जिल्हास्तरावरील रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) हे इंडियन रेडक्रॉस सोसायटीने माहे जानेवारी २०१८ पासून तत्कालीन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा व्यवस्थापन समिती व इंडियन रेडक्रॉस सोसायटी यांच्या मान्यतेने चालविण्यास घेतले आहे. सदर केंद्रामार्फत जिल्ह्यातील दिव्यांगांचे शारिरीक, मानसिक, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक पुनर्वसनाचे कार्य चालते. त्या अंतर्गत दिव्यांगांना सहाय्यक साहित्य उपलब्ध करून देणे, त्यांना स्पिचथेरेपी, फिजीयोथेरेपी, समुपदेशन इ. सेवा देणे तसेच पालकांचे समुपदेशन करणे त्यांना सल्ला व मार्गदर्शन करणे, मेळावे, शिबीरे आयोजीत करुन त्यांना आवश्यकतेनुसार शासनाच्या मदतीने संस्थेच्या मदतीने सेवा सुविधा उपलब्ध करून देणे इ. कार्य सुरू आहे.



**● रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र जळगाव अंतर्गत संपन्न कार्यक्रम व उपक्रम:-** १) दिनांक ३ डिसेंबर २०२३ रोजी जागतिक दिव्यांग दिनाच्या निमीत्ताने DDRC केंद्रातंर्गत फिजियोथेरेपी सेवा देणा-या तज्ञांचा सन्मान करण्यात आला व दिव्यांग व्यक्तींना सहाय्यक साहित्य वाटप करण्यात आले.

२) दिनांक ५ ते ८ डिसेंबर २०२३ या कालावधीत अली यावर जंग नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ स्पिच हिअरींग डिसॅबीलीटी मुंबई यांच्या सहभागाने धरणगाव, चोपडा, पाचोरा, पिंपळगाव हरेश्वर, चाळीसगाव, जळगाव येथील कर्णबधीर व मुकबधीर शाळेतील मुलांचे मुल्यमापन करुन १५० विद्यार्थ्यांना ३५ लक्ष किमतीचे कर्णयंत्रे मोफत वाटप करण्यात आले.

३) ४ ते ५ जानेवारी २०२४ रोजी जिल्ह्यातील प्रज्ञाचक्षूंसाठी संगणकावर NVD- या फ्रीवेअरचा वापर करणेबाबत २ दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा (Use of NVD- Freeware on Computer for Visually Impaired) आयोजीत करण्यात आली. त्यात १५ अंध व्यक्ती उपस्थित होते.




४) १२ जानेवारी २०२४ रोजी स्थानिक आमदार निधी २३-२४ अंतर्गत मा. श्री. किशोर आप्पा पाटील आमदार पाचोरा यांच्या ३० लक्ष निधीतून पाचोरा तालुक्यातील ६०० व्यक्तींना सहाय्यक साहित्य वाटप करण्यात आले.



५) १९ जानेवारी २०२४ रोजी स्थानिक आमदार निधी २३-२४ अंतर्गत मा. मंत्री श्री. अनिल भाईदास पाटील यांच्या २० लक्ष निधीतून अमळनेर तालुक्यातील ४०० व्यक्तींना सहाय्यक साहित्य वाटप करण्यात आले.

६) दिनांक ९ ते १८ मार्च २०२४ या कालावधीत केंद्र शासनाच्या -DIP योजने अंतर्गत व केंद्र शासन अंगीकृत अलिम्को कंपनी मार्फत जिल्ह्यातील एरंडोल, अमळनेर, धरणगाव, चोपडा, पारोळा, पाचोरा, चाळीसगाव व जळगाव तालुक्यातील २००० दिव्यांग व्यक्तींना रु. २ कोटी किमतीचे सहाय्यक साहित्य वाटप करण्यात आले.

७) दिनांक २ व ३ ऑगष्ट २०२४ रोजी केंद्र शासन अंगीकृत जनरल इन्शुरंन्स ऑफ इंडिया यांच्या उड्ठ योजनेतून व -LIMCO मार्फत जिल्ह्यातील दिव्यांगांना बॅटरीवर चालणारी तिनचाकी सायकलसाठी तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबीरात ४५० दिव्यांग व्यक्तींची तपासणी करण्यात आली.

**● जागतिक दिव्यांग दिवस साजरा:-** ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रातर्फे रेडक्रॉस भवन येथे दिव्यांग दिन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.रेडक्रॉस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अंतर्गत दिव्यांग रुग्णाना फिजिओथेरपी देणाऱ्या ५० फिजिओथेरपिस्ट डॉक्टर व उपस्थित मान्यवरांना सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच निवडक दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग सहाय्यक साहित्य मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित दिव्यांग व्यक्तींनी आपल्या हस्तकला प्रदर्शित केल्या. या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या सदस्या व स्वयंदीप प्रकल्पाच्या संचालिका श्रीमती मिनाक्षी निकम यांनी उपस्थित पुनर्वसन तज्ज्ञांना संबोधित करत दिव्यांगांना पुनर्वसनात्मक सेवा देणारे तज्ञ हे खरोखरच दिव्यांगाच्या विकासात मोलाची भूमिका पार पाडत आहे. तसेच दिव्यांगांच्या स्वयं रोजगारासाठी शासन स्थरावर विशेष प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले. या प्रसंगी रेडक्रॉसचे चेअरमन श्री. विनोद बियाणी यांनी जिल्ह्यातील दिव्यांगांचा रोजगार व स्वयंरोजगारासाठी लवकरच विशेष शिबिराचे आयोजन करून त्यांना प्रशिक्षित करून स्वावलंबीत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील असे सांगितले.



**● रेडक्रॉस ई सेतु व आधार सुविधा केंद्र :-** केंद्र व राज्य सरकारचा उपक्रम असलेले आपले सरकार सेवा केंद्र आणि ई सेतु व आधार सुविधा केंद्र रेडक्रॉसमध्ये सुरू असून शासनाने ठरवून दिलेल्या सेवाशुल्कात सेवा दिली जाते. यात उत्पन्न दाखला, आधार कार्ड नवीन व दुरुस्ती, ७/१२ उतारा, हयातीचा दाखला (जीवन प्रमाणपत्र), उद्योग आधार, अधिवास व राष्ट्रीयत्व दाखला, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, नॉन क्रीमिलीयार, जेष्ठ नागरिकत्व, परीक्षा/नोकरी ऑनलाईन फॉर्म, चारित्र्य पडताळणी (पोलीस व्हेरीफिकेशन प्रमाणपत्र), ३३% आरक्षण प्रमाणपत्र, वीजबिल भरणा, नवीन रेशन कार्ड इत्यादी सेवा देण्यात येत आहेत. त्यासाठी स्वतंत्र कक्ष ठेवण्यात आले असून ई सेतु व आधार सुविधा केंद्र, रेडक्रॉस भवन, येथे सोमवार ते शुक्रवार स.१० ते ५ पर्यंत सुरू असते. या केंद्रामार्फत आजपर्यंत ४३०० पेक्षा जास्त नागरिकांना आधारकार्डची सेवा देण्यात आली असून ९०० पेक्षा जास्त नागरिकांनी सेतू केंद्रामधील विविध सुविधेचा लाभ घेतला आहे.

**● रेडक्रॉस जेनेरीक मेडिकल स्टोअर्सची सेवा सुरु :-** जनतेला उत्तम दर्जाची औषधी स्वस्त दरात मिळावी म्हणून भारत सरकार पुरस्कृत जेनेरीक मेडिसीन प्रकल्प रेडक्रॉसमार्फत मागील ९ वर्षांपासून सुरु आहे. या



सेवा... स्नेह... समर्पण...

# ✚ इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव ✚



प्रकल्पा अंतर्गत १) फुलफगर फार्मा, विसनजी नगर २) केदारनाथ मेडिकल स्टोअर्स, रेडक्रॉस भवन, सिव्हील हॉस्पिटल रोड ३) आयुष मेडिकल स्टोअर्स, गुरुदत्त नगर, ४) गितेश मेडिकल स्टोअर्स, ओमशांती नगर, पिंप्राळा या ठिकाणी सर्व सामान्य जनतेला नामवंत कंपन्यांची जेनेरिक औषधी स्वस्त दरात उपलब्ध करून दिली जात आहे. या सर्व मेडिकल स्टोअर्समध्ये जेनेरीक मेडिसिनवर किमंतीच्या ६० ते ७० टक्के सवलत, स्टँडर्ड मेडिसिनवर ५ ते १० टक्के सवलत व आयुर्वेदिक औषधीही सवलतीत दिली जाते. या जेनेरिक मेडिकल दुकानांचा अनेक सर्वसामान्य नागरिक लाभ घेत आहेत. उत्तम दर्जाची औषधी सवलतीच्या दरात मिळत असल्याने नागरिक समाधान व्यक्त करतात.

● **रेडक्रॉस पाटील धर्मार्थ दवाखाना, वाघनगर : –** कै.प्रा. शालीग्राम नवलराम पाटील आणि स्व.सौ. जिजाबाई शालिग्राम पाटील यांनी संस्थेस दान केलेल्या इमारतीत वाघनगर येथे सेवानिवृत्त उपजिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वासुदेव मावळे यांच्या देखरेखीत सुरु असलेल्या रेडक्रॉस संचलित पाटील धर्मार्थ दवाखान्यात महिन्याला जवळपास ९०० रुग्ण सेवेचा लाभ घेत आहेत. तसेच दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी या दवाखान्यात महानगरपालिकेमार्फत गर्भवती महिला व नवजात बालके यांना लसीकरण केले जाते. वाघनगर भागातील रुग्णांची आवश्यकता लक्षात घेता या ठिकाणी महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी जळगाव शहरातील नामवंत डॉक्टरांची सुपरस्पेशालिटी रुग्णसेवाही सुरु आहे. यात स्रीरोग तज्ञ डॉ. संजीवनी चौधरी, अस्थीरोग तज्ञ डॉ.अनुज पाटील, बालरोग तज्ञ डॉ.गौरव महाजन, मानसोपचार तज्ञ डॉ. सतीश पाटील, जुना दमा उपचार तज्ञ डॉ. कल्पेश गांधी हे सेवा देत आहेत. आवश्यकतेनुसार वेळोवेळी विविध शिबिरे घेतली जातात.




● **रेडक्रॉस दवाखाना, पिंप्राळा: –** रेडक्रॉस जळगाव आणि सेवारथ परीवार यांच्या सहकार्याने डॉ. रितेश पाटील यांच्या देखरेखीत पिंप्राळा परिसरात रेडक्रॉस सेवार्थ दवाखाना सुरु करण्यात आला आहे. या दवाखान्यात जनरल तपासणी, दंत तपासणी व उपचार सवलतीच्या दरात औषधी विभाग अशा सेवा रुग्णांना मिळत असून जवळपासच्या परिसरातील नागरिकांना याचा खूप फायदा होत आहे. तसेच अत्यल्प सेवाशुल्कात सेवा सुविधा उपलब्ध असल्याने मागील वर्षभरात जवळजवळ १५००० रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला. या शिवाय आवश्यकतेनुसार या दवाखान्यामार्फत वेळोवेळी आरोग्य शिबिरांचे आयोजनही केले जाते.

● **रेडक्रॉस दवाखाना, रेडक्रॉस भवन : –** शहरातील बरेच दवाखाने दुपारच्या वेळी बंद असतात. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा तपासणी विभाग दुपारी बंद असतो. त्यामुळे रुग्णांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. याचा विचार करून रेडक्रॉस भवन,येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सुरळकर यांच्या देखरेखीत जनरल तपासणी विभाग (OPD) सुरु करण्यात आली आहे. यात सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार केले जात आहेत. यातील गंभीर आजाराच्या रुग्णांना पुढील उपचारार्थ विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात येते.

● **रेडक्रॉस फिरता दवाखाना व औषधोपचार:–** कॅनडियन रेडक्रॉसच्या माध्यमातून आणि राष्ट्रीय शाखा नवी दिल्ली व राज्य शाखा मुंबई यांच्या सहकार्याने रेडक्रॉस जळगाव शाखेला अद्ययावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण अशी मेडिकल व्हॅन मिळाली असून या व्हॅनमुळे जळगाव जिल्ह्यात ग्रामीण व आदिवासी भागात आरोग्य तपासणी शिबीर घेणे शक्य होत आहे. यात चोपडा, यावल, पाचोरा भागातील आदिवासी पाडे, जळगाव शहरातील तांबापुर, कंजरवाडा, मेहरूण, गेंदालाल मिल, सुप्रीम कॉलनी, जुने जळगाव या ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात आली. यात हिमोग्लोबिन, ब्लड प्रेशर, डायबिटीस, मोती बिंदू, इ.सी.जी. या तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आल्या.





● **भव्य आरोग्य तपासणी शिबीर : –** ओरिएंट सिमेंट लिमिटेड यांच्या सी.एस.आर निधी अंतर्गत नशिराबाद येथील जळगाव खुर्द या ठिकाणी दोन दिवसीय आरोग्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात स्त्रीरोग तपासणी, डोळे तपासणी, हाडांची तपासणी, दंतरोग तपासणी, कान नाक घसा तपसणी, जनरल तपासणी इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. या तपासणी शिबिरात ७३७ नागरिकांची तपासणी करण्यात आली. यात १३० जेष्ठ नागरिकांची शुगर व ब्लड प्रेशर तपासणी, १८७ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी, ११० महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी स्त्रीरोग तज्ञ डॉ. नंदा जैन,ऑर्थोपेडिक सर्जन डॉ.गौरव बाफना, दंतरोगतज्ञ डॉ.देवेंद्रप्रताप सिंग, कान नाक घसा तज्ञ डॉ.अरविंद चौधरी, डोळे तपासणी तज्ञ डॉ.उल्हास तासखेडकर, जनरल फिजिशियन डॉ.प्रकाश महाजन या डॉक्टरांनी सेवा दिली. यासाठी ओरिएंट सिमेंट लिमिटेडचे एच.आर.विभाग प्रमुख श्री.रोहित जोशी यांनी विशेष सहकार्य केले.

● **रेडक्रॉस प्रथमोपचार व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण:–**शासकीय,निमशासकीय संस्था, कंपन्या,कारखाने, महामंडळे, संघटना इत्यादि ठिकाणी कामगारांना आवश्यक लागणारे मान्यता प्राप्त प्रथमोपचार प्रशिक्षण वर्ग आयोजित करून कामगारांना तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षित करण्यात येते. यात विविध कंपनीतील कर्मचारी व विविध समाजसेवी संस्थांच्या प्रतींनिधींनी प्रशिक्षण घेतले आहे. तसेच आपत्ती येण्याअगोदर, आपत्ती आल्यावर व आपत्ती आल्यानंतर जी परिस्थिति निर्माण होते त्यात आपदग्रस्तांचे जीव वाचवणे, जखमींना प्रथमोपचार करणे, पुढील उपचारासाठी हॉस्पिटल मध्ये पाठवणे, आपत्कालीन भागातील प्रभावी क्षेत्राची परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी कार्य करणे, परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे या बाबतचे संपूर्ण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात येते आणि तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात येते. मागील वर्षभरात खालील प्रमाणे प्रथमोपचार प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आले.




| अ.नं. | कंपनीचे नाव | प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | महामार्ग वाहतूक नियंत्रण विभाग, पाळधी | ७५ |
| २ | सिमेन्स आणि महालक्ष्मी कंपनी, जळगाव | १४ |
| ३ | एयरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया, छ. संभाजीनगर | ३० |
| ४ | धनाजी नाना महाविद्यालय, जळगाव | ११५ |
| ५ | एच.डी.फायर आणि स्मार्ट सोल्युशन्स, जळगाव | १६ |
| ६ | स्पेक्ट्रम इलेक्ट्रिकल्स इंडस्ट्रिज लिमिटेड, जळगाव | ९० |

● **आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत पूरग्रस्तांना मदत:–** अतिवृष्टीमुळे जळगाव जिल्ह्यातील काही गावांमध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस झाल्याने अनेक परीवारांचे दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले. नदीकाठी राहणाऱ्या अनेक घरांमध्ये पाणी घुसल्याने उपयोगी वस्तु पाण्यात वाहून गेल्या. तसेच वर्षभरातील अनेक ठिकाणी आग लागल्यामुळे संपूर्ण संसार उपयोगी साहित्य जाळून खाक झाले. अशा प्रसंगी परिस्थितीची माहिती घेऊन माननीय जिल्हाधिकारी तथा



सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव



रेडक्रॉस अध्यक्ष श्री. आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनाने इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने प्रत्येक परिवाराला ३० भांडे असलेला सेट, बादली, ताडपत्री, हायजेनिक किट्स इत्यादी साहित्य वितरीत करण्यात आले. यात साईनगर, औद्यागिक वसाहत, यावल तालुक्यातील डोंगरकठोरा गाव, आसोदा, इत्यादी ठिकाणी साहित्य वितरीत करण्यात आले.

● **एच.आय.व्ही.ग्रस्तांना मदतीचा हात:–** जळगाव जिल्ह्यातील एचआयव्ही ग्रस्तांना रेडक्रॉस व जाणीव बहुउद्देशीय संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने सकस आहाराचे वाटप करणे, दिवाळी निमित्त कपडे व मिठाई भेट देणे, थंडीपासून बचाव होण्यासाठी स्वेटर, ब्लँकेटची मदत करणे, त्यांना रेशन मिळावे म्हणून त्यांना रेशन कार्ड बनवून देणे, आधार कार्ड बनवून देणे, एचआयव्हीग्रस्त मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून चांगल्या मार्कांने पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करणे, शैक्षणिक साहित्याची मदत करणे अशा विविध स्वरुपात सहकार्य रेडक्रॉस सतत करीत असते. जागतिक महिला दिनानिमित्त एचआयव्ही ग्रस्त महिलांना व मुलांना किराणा सामान व हायजेनिक किट्सचे वाटप करण्यात आले.

● **ज्युनियर व युथ रेडक्रॉस:–** विश्वबंधुत्व, मानवता आणि सेवाभावनेचे संस्कार हे शालेय वातावरणापासून विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत व सामाजिक जबाबदारीची जाणीव व्हावी या उद्देशाने शाळा–महाविद्यालयांमध्ये ज्युनियर/युथ रेडक्रॉसची स्थापना करण्यात येते. या अंतर्गत आरोग्य,सेवा आणि मैत्री या सिद्धांतावर आधारित उपक्रम राबविले जातात. भविष्यात या उपक्रमांत जास्तीत जास्त शाळा–महाविद्यालये जोडून या उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्यात येणार आहे.



● **लासगाव आणि पाथरी गावांमधील शाळेत ज्युनियर रेडक्रॉसचे उद्घाटन:–** रेडक्रॉस मार्फत माध्यमिक विद्यालय पाथरी आणि जिल्हा परिषद प्राथमिक विद्या मंदिर लासगाव येथे ज्युनियर रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांना ज्युनियर रेडक्रॉस अंतर्गत चालविण्यात येणारे उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले.

● **केंद्रीय विद्यालय येथे ज्युनियर रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन:–** रेडक्रॉस मार्फत केंद्रीय विद्यालय येथे ज्युनियर रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना ज्युनियर रेडक्रॉस अंतर्गत चालविण्यात येणारे उपक्रम आणि उपस्थित सर्व मुलींना सॅनिटरी नॅपकिन वापराबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

● **आय.एम.आर कॉलेज येथे युथ रेडक्रॉस शाखा सुरु:–** इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखामार्फत आय.एम.आर कॉलेज येथे मागील चार वर्षांपासून युथ रेडक्रॉस शाखा सुरु आहे. या अंतर्गत विद्यार्थी रक्तदान जनजागृती, रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान इत्यादी उपक्रम नियमित राबविले जात आहेत. याशिवाय आवश्यकते नुसार इतर कार्यक्रम ही घेतले जातात.

● **शास्त्री कॉलेज ऑफ फार्मसी, एरंडोल येथे युथ रेडक्रॉस शाखा सुरु:–** रेडक्रॉस जिल्हा शाखेमार्फत शास्त्री कॉलेज ऑफ फार्मसी, एरंडोल येथे युथ रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी युथ रेडक्रॉस शाखेमार्फत घेण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. स्वामी विवेकानंदांचे चरित्र आत्मसात करीत विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार करत अभ्यासू वृत्तीने भविष्य घडविण्याबाबत आणि युवकांना क्षणिक सुखाला बळी न पडता व्यसनांपासून दूर राहण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



● **माननीय डॉ. प्रकाशचंद जैन होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च, पळासखेडा जामनेर येथे युथ रेडक्रॉस शाखा सुरु:–** इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा मार्फत डॉ. प्रकाशचंद जैन होमिओपॅथी मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च, पळासखेडा जामनेर येथे युथ रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी कॉलेजमधील प्राध्यापक, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना जगभरातील रेडक्रॉसच्या सेवेची व्याप्ती, युथ रेडक्रॉसचे सेवाकार्य व त्या अंतर्गत घ्यावयाचे उपक्रम याबाबत सविस्तर माहिती दिली. या युथ रेडक्रॉस शाखेत सेवा कार्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी नावे नोंदवली.




● **गोदावरी कॉलेज ऑफ फिजियोथेरपी येथे युथ रेडक्रॉस शाखा सुरु:–** इंडियन रेडक्रॉस सोसायटी मार्फत गोदावरी कॉलेज ऑफ फिजियोथेरपी येथे युथ रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारीबाबत मार्गदर्शन केले. रेडक्रॉस मार्फत युथ रेडक्रॉस अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.

● **अँड.सीताराम आनंदरामजी बाहेती कॉलेज,जळगाव येथे युथ रेडक्रॉस शाखा सुरु:–** इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखेमार्फत अँड.सीताराम आनंदरामजी बाहेती कॉलेज,जळगाव येथे युथ रेडक्रॉस शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी कॉलेजचे प्राध्यापक श्री. बी. जे. लाठी यांनी रेडक्रॉसच्या सेवाकार्याची माहिती दिली. तसेच रेडक्रॉस मार्फत विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार ठेऊन चांगला आयुष्यात चांगली व्यक्ती घडण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.




● **कॅन्सर संजीवन मार्गदर्शन केंद्र:–** कॅन्सर झाल्याचे कळताच बऱ्याच नागरिकांची मनस्थिती खूप खालावते. तसेच सोबत परिवारातील सदस्य ही चिंतीत होतात. अशा प्रसंगी कॅन्सरग्रस्त रुग्णाला आणि परिवाराला मानसिक आधार मिळावा यासाठी त्यांचे समुपदेशन केले जाते. आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या कॅन्सर रुग्णांना कमीतकमी खर्चात उपचार करणे कसे शक्य होईल आणि उपचार करीत असलेल्या डॉक्टरांशी रेडक्रॉसमार्फत संपर्क करुन इतर बाबींसाठी प्रयत्न केले जातात. विविध प्रकारच्या चाचण्या करण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले जाते.

● **रेडक्रॉस ऑक्सिजन बँक:–** रेडक्रॉस राष्ट्रीय शाखा नवी दिल्ली यांच्या सहकार्याने व उपलब्ध करून दिलेल्या २०७ ऑक्सिजन कॉन्संट्रेटर मशीन्सद्वारे रेडक्रॉस जळगाव शाखेमार्फत रेडक्रॉस ऑक्सिजन बँक सुरु करण्यात आली असून ऑक्सिजन कॉन्संट्रेटर मशीन गरजू रुग्णांना वापरासाठी विनामुल्य उपलब्ध करून देत आहोत. विविध आजारांचे उपचार घेत असताना काही आजारांमध्ये रुग्णांना ऑक्सिजनची आवश्यकता भासते. फक्त ऑक्सिजन मशीनसाठी रुग्णांना हॉस्पिटलमध्ये राहावे लागते व त्यांचा अनावश्यक खर्च वाढतो या सर्व बाबींचा विचार करून रेडक्रॉस ऑक्सिजन बँक सुरु करण्यात आली. ज्या रुग्णांना रुग्णालयातून डीस्चार्ज मिळाल्यानंतर डॉक्टरांनी सुचविल्यानुसार घरी ऑक्सिजनची आवश्यकता असते, अशा रुग्णांसाठी ऑक्सिजन कॉन्संट्रेटर देण्यात येते. यासाठी कोणतीही भाडे आकारणी न करता फक्त डीपॉझीट रक्कम घेऊन हि सेवा निरंतर सुरु आहे. आजपर्यंत ५२० रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत.

● **रेडक्रॉस ऑर्थोपेडीक बँक :–** इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव शाखेमार्फत रेडक्रॉस ऑर्थोपेडीक साहित्य लायब्ररी सुरु करण्यात आली आहे. यामध्ये रुग्णांसाठी मोठे बेड, लहान बेड, पाण्याची गादी, हवेची गादी, सक्शन मशीन,



सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव




बायपॅप मशीन, व्हील चेयर, वॉकर, कमोड चेयर, आधार काठी (stick) इत्यादी साहित्य कोणतीही भाडे आकारणी न करता फक्त डीपॉझीट रक्कम जमा करून साहित्य वापरासाठी दिले जाते. शहरात एक चांगली आरोग्य सेवा मिळत असल्याचे समाधान नागरीक व्यक्त करीत आहेत. आत्तापर्यंत २६० रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला आहे.

● **रेडक्रॉस मेडिसिन बँक :–** रेडक्रॉसचे सामाजिक सेवा कार्य लक्षात घेता विविध नामांकित कंपन्यांकडून लहान बालके, गर्भवती महिलांसाठी उपयुक्त असलेली आरोग्यवर्धक प्रोटीन पावडर, Threptin प्रोटीन बिस्किट्स मदत स्वरुपात प्राप्त होत असतात. हे साहित्य शासकीयवैद्यकीय महाविद्यालयात उपचार घेणारी बालके, गर्भवती महिला, दुर्गम भागातील गरजू नागरिक, रिमांड होम, महिला वसतीगृह, बेघर निवारा केंद्र इत्यादी ठिकाणी आवश्यकतेनुसार वितरीत केली जातात.

● **रेडक्रॉस फिजिओथेरपी सेंटर :–** रेडक्रॉसच्या माध्यमातून रेडक्रॉस भवन येथे फिजिओथेरपी सेंटर सुरु करण्यात आले आहे. विविध प्रकारच्या आजारांवरील उपचार करण्यासाठी फिजिओथेरपीची आवश्यकता असते. यामध्ये पाठदुखी, मानदुखी, कंबरदुखी, सांधेदुखी, गुडघेदुखी, न्यूरो फिजिओथेरपी, अर्धांगवायू, मुलांसाठी फिजिओथेरपी यांचा समावेश आहे. हि सेवा अत्यल्प दरात सुरु असून अपंग व्यक्तींना मोफत फिजिओथेरपी सेवा दिली जाते. अनेक नागरिक या सेवेचा लाभ घेत आहेत.



● **पल्स ऑक्सिमीटर वितरण :–**रेडक्रॉस राज्य शाखा नवी दिल्ली आणि रेडक्रॉस राज्य शाखा मुंबई यांच्या सहकार्याने रेडक्रॉस जळगाव शाखेला ६००० पल्स ऑक्सिमीटर प्राप्त झाले. हे पल्स ऑक्सिमीटर जळगाव जिल्ह्यातील सर्व डॉक्टर्स, पॅरामेडिकल स्टाफ, नर्सिंग स्टाफ, सर्व मेडिकल कॉलेजमधील वैद्यकीय अधिकारी, प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स, रक्तदान शिबीर आयोजक, स्वयंसेवक, आपदा मित्र प्रशिक्षणार्थी यांना भेट देण्यात आले. या व्यतिरिक्त तालुका स्तरावरील सर्व डॉक्टर्स आणि सर्व पॅरामेडिकल स्टाफला पल्स ऑक्सिमीटर भेट देण्यात आले.

● **जागतिक आरोग्य दिन–एरंडोल येथे यशोदाई ब्लड स्टोरेज सेंटरची सेवा:–** जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून रेडक्रॉस रक्तकेंद्र जळगाव मदर ब्लड सेंटर असलेल्या आई हॉस्पिटल्स यशोदाई ब्लड स्टोरेज सेंटरचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. या उद्घाटन सोहळ्यासाठी एरंडोल धरणगाव कासोदा पारोळा भडगाव या तालुक्यांमधील डॉक्टर्स, समाजसेवक, रक्तदान शिबिर आयोजक उपस्थित होते. या सोहळ्यासाठी उद्घाटक म्हणून एरंडोल तालुका डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुधीर काबरा, पारोळा तालुका डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. महेश पवार, धरणगाव तालुका डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ मिलिंद डहाळे, डॉ.अरुण कुलकर्णी, एरंडोल तालुका पोलीस निरीक्षक श्री.सतीश गोराडे, रेडक्रॉसचे उपाध्यक्ष श्री.गनी मेमन, चेअरमन श्री. विनोद बियाणी, रक्तकेंद्र चेअरमन डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी, आपत्ती व्यवस्थापन चेअरमन श्री.सुभाष सांखला, सहप्रशासकीय अधिकारी डॉ.राजेश सुरळकर, सुखकर्ता फाउंडेशनचे डॉ.नरेंद्र ठाकूर व मान्यवर उपस्थित होते. तातडीच्या प्रसंगी या स्टोरेज सेंटरमुळे रुग्णांना फायदा होणार असून एक चांगली आरोग्य सेवा सुरु झाल्याचे समाधान मान्यवरांनी व्यक्त केले.



● **शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वॉटर कुलर आणि बेंचेसची व्यवस्था:–** जागतिक एड्स दिनानिमित्त रेडक्रॉस आणि मेरिको लिमिटेड यांच्या सी.एस.आर निधी अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रुग्णसेवेसाठी सिमेंट बेंचेस आणि वॉटर कुलरचे लोकार्पण करण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त आहे. यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना बऱ्याच वेळा प्रतीक्षा करावी लागते. प्रसंगी मुक्कामी थांबावे लागते. रुग्णांच्या नातेवाईकांना बसण्याची चांगली व्यवस्था असावी या उद्देशाने १७ सिमेंट बेंचेस तसेच पिण्याच्या पाण्याची चांगली व्यवस्था असावी या उद्देशाने सेवालयाजवळ आर ओ सिस्टीमसह एक वॉटर कुलर बसविण्यात आले. यासाठी मेरिको लिमिटेडच्या सौ.विशाखा बापट, श्री.श्रीकृष्ण वाणी, सेफ्टी ऑफिसर श्री.प्रशांत शर्मा, श्री. प्रशांत पगार यांचे सहकार्य मिळाले.



● **विद्यालयात सॅनिटरी नॅपकिन वितरण व जनजागृती :–** शहरातील हरिजन कन्या छात्रालय शिवाजीनगर येथील मुलींना सॅनिटरी नॅपकिन वितरण करण्यात आले. या प्रसंगी सॅनिटरी नॅपकिन वापरण्याबाबत माहिती, न वापरल्याचे दुष्परिणाम आणि हायजीनेशन याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करत अभ्यासाकडे लक्ष दिले पाहिजे असे मार्गदर्शन ही करण्यात आले.

● **विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण :–** रेडक्रॉस आणि मेरिको लिमिटेड तसेच स्व. अण्णासाहेब सागरमल सांखला अर्बन को–ऑपरेटीव सोसायटी यांच्या सहकार्याने महानगरपालिका शाळा आणि विना अनुदानित शाळांमध्ये मागणीनुसार गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे व इतर शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यात सर्व शाळा मिळून एकूण ६२५ विद्यार्थ्यांना २५०० वह्या वितरीत करण्यात आल्या. या वह्यांवर छापण्यात आलेल्या आरोग्य विषयक माहितीमुळे विद्यार्थ्यांना दैनदिन आहाराबाबत माहिती मिळत आहे.



● **रस्ता सुरक्षा अभियानाबाबत माहितीपर चर्चासत्र :–**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मधील केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमाबाबत माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यात रेडक्रॉसचे आजीवन सभासद श्री. दिगंबर महाजन यांनी विद्यार्थ्यांना अपघाताची प्रमुख कारणे, वाहतुकीचे नियम, वाहन चालविताना घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जनसंपर्क अधिकारी सौ.उज्वला वर्मा यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या उपक्रमासाठी केंद्रीय विद्यालयातील सौ. मीनाक्षी पाटील व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

● **आरोग्य तपासणी अभियान:–**माननीय जिल्हाधिकारी श्री.आयुष प्रसाद (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार वर्षभरात अनेक ठिकाणी आरोग्य तपासणी अभियान राबविण्यात आले. यात प्रामुख्याने ब्लड प्रेशर, शुगर, हिमोग्लोबिन आणि डोळे तपासणी करण्यात आली. यात २९ नोव्हेंबर २०२३ ते २९ डिसेंबर २०२३ या दरम्यान घेण्यात आलेल्या आरोग्य तपासणी अभियानात ६३७ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. १ जानेवारी २०२४ ते ३१ जानेवारी २०२४ दरम्यान ४३२ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. १ फेब्रुवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान ३४० नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

● **केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी:–** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ मधील केंद्रीय विद्यालयातील ४५० विद्यार्थ्यांची तज्ञ डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली. यात जनरल फिजिशियन डॉ. राजेश सुरळकर, नेत्ररोग तज्ञ डॉ. उल्हास तासखेडकर, कान



## सेवा... स्नेह... समर्पण...

# ✚ इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव ✚




नाक घसा तज्ञ डॉ. अरविंद चौधरी, दंतरोग तज्ञ डॉ. देवेंद्रप्रताप सिंग, डॉ.विशाल जैन यांनी सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली.

● **ज्येष्ठ नागरिक मेळाव्याचे आयोजन:-** रेडक्रॉस जळगाव मार्फत एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक श्रेष्ठ नागरिक स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. ५०० जेष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत हा स्नेहमेळावा संपन्न झाला. ज्येष्ठ नागरिकांना मानसिक चिंता, कौटुंबिक ताणतणाव, पारिवारिक समस्या, मोबाईलचा योग्य वापर न केल्यामुळे होणारे सायबर क्राईम यासारख्या अनेक विषयांना सामोरे जावे लागते. या सर्व अडचणीवर मात करण्यासाठी रेडक्रॉस मार्फत ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य करण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन रेडक्रॉस अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मा.श्री.आयुष प्रसाद यांचे उपस्थितीत संपन्न झाले. यात मन:स्वास्थ्य या विषयावर सौ.विणा महाजन, ज्येष्ठ नागरिक कायदा या विषयावर श्री.अर्पित चव्हाण (भा.प्र.से.), आरोग्य व आहार या विषयावर डॉ.जयंत जहागीरदार, शासकीय व इतर सुविधा या विषयावर श्री. डी. टी. महाजन, मोबाईल सायबर क्राइम छंद या विषयावर पुणे येथील सौ.विद्या दातार-कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. समारोप प्रसंगी श्री.नीलकंठ गायकवाड, श्री.संभाजी देसाई, श्री.सिद्धार्थ बाफना यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी रतनलाल सी.बाफना फाउंडेशनचे सहकार्य लाभले.

● **देहदान-अवयवदान जनजागृती :-** रेडक्रॉस जळगाव शाखेने देहदान-अवयवदान जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मुंबई येथील द फेडरेशन ऑफ ऑर्गन डोनेशन, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि रेडक्रॉस यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात देहदान आणि अवयवदान जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली.




याप्रसंगी द फेडरेशन ऑफ ऑर्गन डोनेशनचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम पवार यांनी समज-गैरसमज बाबत सर्वांना मार्गदर्शन केले. यावेळी देहदान आणि अवयवदान करणाऱ्या परिवारांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच शासनाच्या अध्यादेशानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, इतर वैद्यकीय महाविद्यालये,इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि इतर सेवाभावी संस्था यांच्या सहकार्याने जनजागृती रलीचे आयोजन कण्यात आले. यात १००० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून सर्व विद्यार्थ्यांना पल्स ऑक्सिमीटर भेट देण्यात आले.

● **जेष्ठ नागरिक दिनानिमित्त श्री. सुरेंद्र धांडे ह्यांनी घेतला सहकुटुंब देहदानाचा संकल्प :-** रेडक्रॉसमार्फत जळगाव शहरातील अनेक संस्था, सामाजिक समूह आणि लहान मोठ्या बैठकीच्या ठिकाणी देहदान-अवयवदान बाबत समज-गैरसमज दूर करून प्रचार-प्रसार सुरु केला. रेडक्रॉसच्या या प्रयत्नांना आता चांगला प्रतिसाद मिळत आहे. याचाच एक भाग म्हणून जळगाव शहरातील मुक्ताईनगर कॉलनीतील श्री. सुरेंद्र केशव धांडे यांनी आपल्या मृत्युंनतर आपला मृतदेह जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात महाबिद्यालयीन विद्यार्थाना शरीररचना शास्त्राचा अभ्यास करणेसाठी दान करण्याचा संकल्प करून तसे संकल्प पत्र रेडक्रॉसला सुपूर्द केले. पुढील काळात हि चळवळ अधिक बळकट करण्यासाठी आणखी जोमाने प्रयत्न केले जाणार आहेत.

● **महिलांचे आरोग्य तपासणी अभियान:-** आंतराष्ट्रीय महिला दिनानिमित्त चाइल्ड अँड वूमन्स केअर या संस्थेच्या पुढाकाराने रेडक्रॉस मार्फत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या तपासणी शिबिरात ८५ महिला व मुलींची हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी करण्यात आली. सर्व महिलांची जनरल आरोग्य





तपासणी करून औषधी वितरीत करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व महिलांना हायजेनिक किट्स भेट देण्यात आले.

● **जागतिक परिचारिका दिन व मदर्स डे साजरा:-** जागतिक परिचारिका दिनानिमित्त रेडक्रॉस अकोला आणि अजिंक्य कौशल्य विकास प्रशिक्षण संस्था अकोला यांच्या सहकार्याने जळगाव रेडक्रॉसमार्फत परिचारिकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. यात रुग्णाशी करावयाचा सुसंवाद, काम करतांना आपली मानसिकता आणि कामाचे दडपण इत्यादी बाबींचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यासाठी अकोला शहरातील परिचारिकांचा उत्स्फूर्त प्रतीसाद मिळाला. तसेच मदर्स दिनाचे औचित्य साधून स्वयंपाक घरात काम करतांना घ्यावयाची काळजी आणि त्यासंबंधी आवश्यक प्रथमोपचार या बाबत महिलांना माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी अनेक माहित नसलेल्या बाबींची माहिती मिळाल्याचे समाधान सर्व महिलांनी व्यक्त केले.

● **आंतराराष्ट्रीय महिला दिन साजरा:-** आंतराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रेडक्रॉस, विश्वनाथ आर.पाटील फाउंडेशन आणि स्माईल फाउंडेशन सामनेर यांच्या सहकार्याने एच.आय.व्ही. बाधित महिला व बालकांना नवीन कपडे, किराणा साहित्य व हायजेनिक किट्सचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी शहर पोलीस स्टेशनचे निरीक्षक श्री. भवारी साहेब, विश्वनाथ आर. पाटीलचे संचालक श्री. पाटील साहेब, सौ.शारदा पाटील, जाणीव बहुउद्देशीय संस्थेच्या सौ. मनीषा बागुल, श्री. प्रविण पाटील, रेडक्रॉसचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते साहित्य वितरीत करण्यात आले.



● **लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदान जनजागृती उपक्रम:-** इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगावच्या वतीने जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष मा.श्री.आयुष प्रसाद यांच्या विशेष मार्गदर्शनानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांचा उत्साह वाढावा आणि जास्तीत जास्त नागरिकांनी देशाच्या सक्षमीकरणासाठी स्वयंस्फूर्तीने मतदान करावे आणि मतदानाचे टक्केवारी वाढावी यासाठी शहरातील मतदान केंद्रावर आधी मतदान मग रक्तदान-सक्षम देश घडविण्यासाठी अशा आशयाचे सेल्फी पॉईंट्स लावण्यात आले. सोबतच "मी मतदान केले आपणही करा" असे लिहिलेल्या बॅचेसचे हजारोंच्या संख्येने वितरण करण्यात आले. रेडक्रॉसच्या स्वयंसेवकांनी मतदान केंद्रांवर थांबून नागरिकांना या बॅचेसचे वितरण केले. मतदानाच्या दिवशी जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष मा.श्री.आयुष प्रसाद यांनी रेडक्रॉस भवन येथे उपस्थित राहून उत्साहाने आणि उत्स्फूर्तपणे मतदान केलेल्या रेडकॉस पदाधिकारी, सभासद, कर्मचारी आणि उत्साही मतदार या सर्वांसोबत समूह फोटोग्राफ काढला व सामुहिक राष्ट्रगीत म्हणत वातावरणात राष्ट्रभक्ती जागविली. मतदानाचा उत्साह असाच टिकून राहावा आणि जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे यासाठी जिल्हाधिकारी महोदयांनी सर्वांना आवाहन केले.

● **जागतिक रेडक्रॉस दिन सप्ताह व थॅलेसीमिया दिन साजरा साजरा:-** जागतिक रेडक्रॉस दिन हा दिवस भर विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. यात शहरातील गांधी उद्यान आणि भाऊंचे उद्यान येथे फिरायला येणाऱ्या १८३ नागरिकांची विनामुल्य शुगर व ब्लड प्रेशर तपासणी शिबीर करण्यात आली. जागतिक रेडक्रॉस दिनाचा मुख्य कार्यक्रम हा सर्व मान्यवर, पदाधिकारी, कार्यकारिणी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.



## सेवा... स्नेह... समर्पण...

# इंडियन रेडक्रॉस सोसायटी जिल्हा शाखा जळगाव



यावेळी जिल्हाधिकारी तथा रेडक्रॉस अध्यक्ष मा.श्री.आयुष प्रसाद यांच्या शुभहस्ते रेडक्रॉस ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. या दिना निमित्त रेडक्रॉसमार्फत थॅलेसिमिया अमृत योजनेत देणगी देणाऱ्या देणगीदात्यांचा सन्मान करण्यात आला. रेडक्रॉसच्या नवीन सभासदांना सभासदत्व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच यावेळी रेडक्रॉस मार्फत दरवर्षी दिला जाणारा श्रीमती सरला दाते उत्कृष्ट सेवा पुरस्कार या वर्षासाठी गेल्या ३० वर्षांपासून रेडक्रॉस केंद्रात सेवा देणाऱ्या टेक्निकल सुपरवायझर श्री. अनिल वामन भोळे आणि गेल्या ८ वर्षांपासून रेडक्रॉसच्या प्रशासन विभागात सेवा देणाऱ्या श्री.मनोज नामदेव वाणी यांना स्मृतिचिन्ह व धनादेश देऊन प्रदान करण्यात आला. या दिनानिमित्त शास्त्री फार्मसी ऑफ फार्मसी येथील युथ रेडक्रॉस अंतर्गत रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी १५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.

● **रेडक्रॉस आयोजित विनामूल्य थॅलेसीमिया एच.एल.ए. तपासणी शिबीर:-** इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव यांच्या पुढाकाराने आणि कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटल,मुंबई,पेरेंट्स असोशिएशन थॅलेसीमिक युनिट ट्रस्ट यांच्या सहकार्याने थॅलेसीमियाग्रस्त बालक आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांची विनामूल्य एच.एल.ए. तपासणी शिबिराचे आयोजन रेडक्रॉस भवन येथे करण्यात आले. या तपासणी शिबिरात महाराष्ट्रातील जळगाव, वाशिम, नांदेड,चंद्रपूर, परतवाडा, नंदुरबार, पुणे, मुंबई, पंढरपूर, औरंगाबाद,धुळे,परभणी, अमरावती या सर्व जिल्ह्यातील ७४ परिवारांनी या तपासणी शिबिराचा लाभ घेतला कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटलच्या डॉ.मनम मेहरा यांनी या तपासणी शिबिरा बाबत संपूर्ण माहिती देत रिपोर्ट आल्यानंतर असणाऱ्या संपूर्ण प्रक्रियेबाबतची माहिती




थॅलेसीमियाग्रस्त बालकांना या तपासणी शिबिराद्वारे जीवन संजीवनी मिळण्याचे मोठे कार्य होणार असल्याचे उद्गार जिल्हा पोलीस अधीक्षक मा.डॉ.महेश्वर रेड्डी यांनी व्यक्त केले याप्रसंगी कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटलच्या डॉ. निराली संघवी, पेरेंट्स असोसिएशन थॅलेसीमिक युनिट ट्रस्टच्या ज्योती टंडन, समन्वयक मायकल लुईस व रेडक्रॉस पदाधिकारी उपस्थित होते.

